पुढारी

## शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराडचा अभिनव उपक्रम

# कॉमिक बुकच्या माध्यमातून सायबर सुरक्षेचा जागर



कराड : सादरीकरण करताना प्राध्यापक व विद्यार्थी.

**कराड : पुढारी वृत्तसेवा**

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड येथील सायबर शक्ती क्लबतर्फे नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी विशेष मनोरंजक सायबर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाकरिता महाराष्ट्र शासन सायबर विभाग तसेच क्विक फाउंडेशन यांचे सहकार्य लाभले. वाढत्या सायबर फसवणुका आणि ऑनलाइन घडणाऱ्या विविध सायबर गुन्ह्यांबाबत नागरिकांना माहिती देणे तसेच त्यापासून सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक खबरदारी समजावून सांगणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.

विद्यार्थ्यांनी सादर केलेले 'सायबर जनजागृती अभियान'. या अभियानामध्ये विद्यार्थ्यांनी डॉक्टर, शिक्षक, विद्यार्थी, उद्योजक, वकील तसेच बँक कर्मचारी अशा विविध सामाजिक भूमिकांचे सादरीकरण केले. त्याचबरोबर काही विद्यार्थ्यांनी सायबर हॅकरच्या भूमिका साकारून विविध प्रकारच्या सायबर फसवणुकींचे मनोरंजक पद्धतीने सादरीकरण केले.

विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या आकर्षक पोस्टर्सच्या माध्यमातून डिजिटल अरेस्ट, ऑनलाइन बँकिंग फसवणूक, बनावट लिंक, सोशल मीडिया स्कॅम्स, बनावट कॉल्स आणि इतर आधुनिक सायबर फसवणुकींच्या प्रकारांबाबत जनजागृती करण्यात आली. प्राचार्य डॉ. एस. जे. वाघ यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यावेळी सायबर शक्ती क्लब समन्वयक डॉ. प्रियांका शिंदे यांनी आजच्या डिजिटल युगात सायबर सुरक्षा ही केवळ खढ क्षेत्रातील व्यावसायिकांची जबाबदारी नसून प्रत्येक भारतीय नागरिकासाठी आवश्यक बाब असल्याचे सांगितले.

कार्यक्रमादरम्यान नागरिकांना विशेष सायबर जनजागृती कॉमिक पुस्तिकांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमास प्राचार्य डॉ. संजीव वाघ, उपसंचालक डॉ. एस. के. पाटील, एम. सी. ए विभागप्रमुख प्रा. भागवत पाटील, क्लब समन्वयक प्रा. डॉ. प्रियांका शिंदे, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. आळसुंदकर, तसेच अधिष्ठाता डॉ. उमेश देशपांडे, अधिष्ठाता प्रा. उमा पाटील, विभागप्रमुख प्रा. सुनील पाटील उपस्थित होते.

My Satara Edition
Aug 20, 2026 Page No. 03
Powered by: erelego.com